**शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, वर्धा**

**दरपत्रक सुचना**

जा.क्र.प्राशिवि/द.प्र./ई.नि./73/2025-26 दिनांक. 8/12/2025

जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा स्तरीय क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रम दिनांक 3 ,4,5 जानेवारी 2026 या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल मध्ये आयोजीत आहे. सदर कार्यक्रमाकरिता

1. निमंत्रण पत्रिका, भोजन पासेस, बॅनर्स छपाई, बॅचेस, मोमंटो तयार करणे,
2. मंडप डेकोरेशन अंतर्गत सुविधा व
3. तीन दिवस मान्यंवर/ विद्यार्थी / शिक्षक / अधिकारी / कर्मचारी यांना भोजन व नाश्ता इ. पुरविण्याबाबत पंजीकृत पुरवठा धारकांकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

विहीत कालावधीमध्ये प्राप्त होणाऱ्या व अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पुरवठा धारकांचाच विचार करण्यात येईल. दरपत्रकाबाबत अटी व शर्ती शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, वर्धा येथे उपलब्ध असुन www.zpwardha.in जि.प. वर्धा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,वर्धा

Scanned with OKEN Scanner

दरपत्रक क्र.2

## शिक्षण विभाग (प्राथमिक ) जिल्हा परिषद,वर्धा

**जिल्हा परिषद शाळातील विदयार्थ्यांसाठी जिल्हा स्तरीय क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रम करिता नास्ता,भोजन सेवा पुरविणे इत्यादी करिता अटी व शर्ती.**

1. मोहरबंद लिफाप्यावर पुरवठा करण्याबाबत **नास्ता,भोजन सेवा पुरविणे** दरपत्रके असे लिहीणे आवश्यक आहे.
2. दरपत्रके सादर करण्याचे ठिकाण शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प. वर्धा येथे दिनांक 16/12/2025 रोजी सायंकाळी 6.00 वाजे. पर्यंत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.
3. प्राप्त दरपत्रके दिनांक 17/12/2025 रोजी दू. 1.00 वा. शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प. वर्धा येथे उघडण्यात येतील. दरपत्रके उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याची मुभा राहील.
4. दरपत्रकात साहित्याचे दर GST सह किंवा GST वगळून असे स्वतंत्रपणे नमुद करावे.
5. पुरवठा आदेश निर्गमित झाल्यानंतर 3 दिवसाचे आत मागणी केलेल्या साहित्याचा पुरवठा करणे पुरवठा धारकास बंधनकारक राहील.
6. कार्यालयीन पुरवठा केल्यानंतर त्यासंबंधीचे देयके आगाऊ मुद्रांक पावतीसह सादर करावे. प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास कोणताही विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.
7. दरपत्रक/निविदाधारकास निविदा मंजुर झाल्यानंतर रु. 500/- च्या मुद्रांकावर अटी व शर्ती मान्य आल्याबाबत करारनामा करुन दयावा लागेल .
8. दरपत्रक/निविदा सादर करणाऱ्या दरपत्रक/ निविदाधारकांचा खरेदी/सेवा कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसल्याबाबतचे तसेच इच्छुक संस्थेने एकच निविदा भरली असल्याबाबत हमीपत्र (प्रपत्र- अ) जोडणे आवश्यक आहे.
9. कार्यक्रमाची तारीख व स्थळ यामध्ये बदल करण्याचे अधिकार शिक्षण विभाग (प्राथमिक) जि. प. वर्धा यांचे कडे राखीव आहेत. तसेच अटी व शर्ती शिथिल करण्याचे अधिकार निविदा समितीला राहतील.
10. दरपत्रक/ निविदा सादर करण्याबाबतची सुचना जि.प.संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.
11. दरपत्रके/ निविदा दोन लिफापा पध्दतीमध्ये खालील प्रमाणे सादर करावा लागेल.

**तांत्रीक लिफापा क्र. 1 :-**

अ. आस्थापने व दुकाणे अधिनियम परवाना प्रमाणपत्राची प्रत/उदयम प्रमाणपत्र

**ब.** पॅनकार्ड प्रत सोबत जोडावी लागेल.

**क.** दरपत्रक/ निविदा सादर करणाऱ्या दरपत्रक / निविदाधारंकाचा खरेदी / सेवा कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसल्याबाबतचे तसेच इच्छुक संस्थेने एकच निविदा भरली असल्याबाबत हमीपत्र (प्रपत्र-अ)

ड. वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST)

इ. रु. 5000/- रुपयाचा डी.डी./धनादेश शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प. वर्धा यांचे नावे अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

**फ.** सन 2025-26 वर्षाचे आयकर विवरण (रिटर्न फॉर्म)

**ग.** अन्न व औषधी प्रशासन विभागाचे प्रमाणपत्र (Food & Drugs)

**व्यापारी (दराचा) लिफापा क्र. 2**

अ. दर दर्शविणारे दरपत्रक (जी. एस. टी. कराची रक्कम स्वतंत्रपणे दर्शवुन/जी. एस. टी. सह)

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद वर्धा

Scanned with OKEN Scanner

# शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, वर्धा

## जिल्हा खेळ व क्रीडा महोत्सव 2025-26

## नास्ता भोजन सेवा पुरविण्याबाबतचा तपशिल संपुर्ण कालावधी

| अ.क्र. | कालावधी | सेवा उपलब्धतेचा तपशिल | संभाव्य विद्यार्थी / शिक्षक / इतर अधिकारी / कर्मचारी संख्या | पुरवठादाराचे दर ( जि.एस.टी.सह) |
|---|---|---|---|---|
| 1. | पहिला दिवस | 1 सकाळी नाश्ता :- ( मोट उसळ, पोहा, उपमा ) ( पुर्ण वेळ मिनरल वाटर कॅन शुध्द पाणी सह ) | 700 | |
| | | 2 दुपारचे भोजन :- ( पोळी, भाजी, तूर डाळ वरण, भात व सलाद, एक गोड पदार्थ बर्फी) ( पुर्ण वेळ मिनरल वाटर कॅन शुध्द पाणी सह) | 1200 | |
| | | 3 संध्याकाळचे भोजन :-( पोळी, भाजी, तूर डाळ वरण, भात व सलाद ) ( पुर्ण वेळ मिनरल वाटर कॅन शुध्द पाणी सह ) | 600 | |
| 2. | दुसरा दिवस | 1 सकाळी नाश्ता :- ( मोट उसळ, पोहा, उपमा ) ( पुर्ण वेळ मिनरल वाटर कॅन शुध्द पाणी सह ) | 600 | |
| | | 2 दुपारचे भोजन :- ( पोळी, भाजी, तूर डाळ वरण, भात व सलाद ) ( पुर्ण वेळ मिनरल वाटर कॅन शुध्द पाणी सह) | 700 | |
| | | 3 संध्याकाळचे भोजन :-( पोळी, भाजी, तूर डाळ वरण, भात व सलाद ) ( पुर्ण वेळ मिनरल वाटर कॅन शुध्द पाणी सह ) | 500 | |
| 3. | तिसरा दिवस | 1.सकाळी नाश्ता :- ( मोट उसळ, पोहा, उपमा ) ( पुर्ण वेळ मिनरल वाटर कॅन शुध्द पाणी सह) | 400 | |
| | | 2. दुपारचे भोजन :- ( पोळी, भाजी, तूर डाळ वरण, भात, सलाद व एक गोड पदार्थ गुलाब जामुन इत्यादी ) ( पुर्ण वेळ मिनरल वाटर कॅन शुध्द पाणी सह ) | 500 | |

Signature

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, वर्धा

Scanned with OKEN Scanner